**Publication:** Navashakti
**Date:** 8/11/2014
**Edition:** Mumbai
**Page No:** 7
**Headline:** ‘TCS IT Wiz 2014’ Mumbai round from 16 November

# ‘टीसीएस आयटी विझ २०१४’ची मुंबई फेरी १६ नोव्हेंबरला

मुंबई, शुक्रवार (प्रतिनिधी) – टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेस अर्थात टीसीएसने टीसीएस विझ २०१४च्या मुंबई फेरीची घोषणा केली आहे. येत्या दि. १६ नोव्हेंबर रोजी टीसीएस आयटी विझ मुंबईतील वांद्रे रेक्लेमेशन येथील लीलावती रुग्णालयासमोरील इंडियन एज्युकेशन सोसायटी, माणिक सभागृह येथे पार पडेल. इयत्ता आठवी ते बारावीतील विद्यार्थी टीसीएस आयटी विझमध्ये सहभागी होऊ शकतात. या स्पर्धेसाठी कोणत्याही प्रकारचे प्रवेशशुल्क भरण्याची आवश्यकता नाही. टीसीएस आयटी विझमध्ये सहभागी होण्यास इच्छुक असलेली कोणतीही शालेय संस्था दहा संघ पाठवू शकते. एका संघामध्ये फक्त दोनच स्पर्धक असू शकतात. यंदाच्या वर्षी टीसीएस आयटी विझच्या विभागीय फेऱ्या अहमदाबाद, बंगलोर, भुवनेश्वर, चेन्नई, कोईम्बतूर, दिल्ली, हैद्राबाद, इंदूर, कोची, कोलकाता, लखनौ, मुंबई, नागपूर व पुणे या चौदा शहरांमध्ये घेतल्या जात आहेत. इच्छुक शालेय संस्थांनी आपापल्या प्रवेशिका १४ नोव्हेंबरपर्यंत शामला पद्मनाभन किंवा मनिषा शेट्टी यांच्याकडे टीसीएस आयटी विझ कोऑर्डिनेटर, टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेस, रॅव्हेलीन स्ट्रीट, २१ डीएस मार्ग, फोर्ट, मुंबई – १ या पत्त्यावर पाठवाव्यात असे आवाहन करण्यात आले आहे.